दावा दाखल तारीख : १६/११/२००९
दावा नोंद दिनांक : १६/११/२००९
निकाल दिनांक : १७/०४/२०२३
कालावधी वर्ष :१३ महिने :०५ दिवस :०१

# न्यायाधीश,सहकार न्यायालय क्र.१ सांगली यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी एस.एस.पोरे)

सहकारी वाद क्र.७६८/२००९

निशाणी क्र.९९

श्री. गजानन ग्रामीण बिगर शेती सहकारी
पतसंस्था मर्यादित, कुमठे, ता. तासगांव, **वादी**
शाखा - कुमठे तर्फे मॅनेजर श्री. दत्तात्रय बाबासो पाटील
वय - ३५ वर्षे, रा. कुमठे.

Seal of the Judge Cooperative Court No.1 Sangli

**विरुध्द**

१) फडणीस गुणवंत पाटील ( मयत) **जाबदेणार**
वय - ३९ वर्षे, धंदा - मोटर वायडिंग,
१.१) श्रीमती रुपाली फडणीस पाटील
वय- ५० वर्षे, धंदा - घरकाम व शेती,
१.२) अक्षय फडणीस पाटील
वय - २६ वर्षे, धंदा - शेती,
१.३) प्रितेश फडणीस पाटील
वय - २२ वर्षे, धंदा - शेती,
१.४) धनश्री फडणीस पाटील
वय - ३५ वर्षे, धंदा - घरकाम,
सर्व रा. उपळावी, ता. तासगांव, जि. सांगली.
२) रुपाली फडणीस पाटील
वय - ३२ वर्षे, धंदा - शेती व घरकाम,
३) फडणीस बाळू पाटील
वय - ४१ वर्षे, धंदा - शेती,
सर्व रा. मु.पो. उपळावी,
ता. तासगांव, जि.कुमठे.

17/4/23

वादीतर्फे :ॲड.एस.एम.उपाध्ये
जाबदेणार क्र.१.१, १.३,२ व ३ तर्फे :
ॲड.एस.एन.नानवाणी
जाबदेणार क्र.१.२ व १.४ : एकतर्फा

## न्यायनिर्णय

(दिनांक १७/०४/२०२३)

१. प्रस्तुत वाद रक्कम रु.६,७३,७३४/- च्या पुढील व्याजासह वसुलीसाठीचा आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, ती महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०, नुसार नोंदणी केलेली संस्था आहे. जाबदेणार क्र.१ ते ३ हे तिचे सभासद आहेत. जाब देणार क्र.१ ने वादीकडे कर्ज मागणीसाठी केलेल्या अर्जावरुन वादीने त्यास दिनांक ०२/०२/२००५ रोजी रक्कम रु.३,२२,०००/- चे कर्ज अदा केले. सदर कर्जासाठी प्रतिवर्षी १५ टक्के असा व्याज दर ठरला होता. जाबदेणार क्र.२ व ३ यांनी सदर कर्जास जामिनकी स्विकारली आणि सर्व जाबदेणारांनी कर्जरोखा, वचनचिठ्ठी, लेटर ऑफ लीन ॲन्ड सेट ऑफ अशी कागदपत्रे सदर कर्जासाठी लिहून दिली. सदर कर्जाची मुदतीत परतफेड करण्याचे ठरले होते. मात्र जाबदेणारांनी सदर कर्जाची परतफेड मुदतीत केली नाही. त्यामुळे रक्कम रु.६,७३,७३४/- व त्यावर पुढील व्याज द.सा.द.शे.१५% दराने वसुलीसाठी वादीस प्रस्तुत वाद दाखल करणे भाग पडले.

३. जाबदेणार क्र.१ ने नि.१७ येथे कैफियत दाखल केली आहे. सदर कैफियतीमध्ये त्याने असे कथन केले आहे की, जाबदेणार क्र.१ ते ३ हे वादी संस्थेचे कधीही सभासद नव्हते व नाहीत. त्याने कर्ज मागणी केलेली नसल्यामुळे तो कर्जदार नाही. त्याने कधीही कर्ज कागदपत्रे लिहून दिलेली नव्हती व नाहीत. कागदपत्रावरील सहया खोटया व बनावट आहेत. खाते उताऱ्यावरील सर्व नोंदी चुकीच्या आहेत. दि.०२/०२/२००५ रोजी रक्कम रु.३,०२,०००/- व दि.०७/०२/२००५ रोजी रक्कम रु.२०,०००/- च्या कर्जाची उचलच

17/4/23

केली नसल्यामुळे वादीचा दावा रद्द होणेस पात्र आहे. वादीकडून भरपाई खर्च रु.२५,०००/- मिळणेची विनंती त्याने केली आहे.

४. जाबदेणार क्र.२ व ३ यांनी प्रस्तुत वादात हजर होऊन देखील कैफियत दाखल केली नाही.

५. प्रस्तुतचा वाद प्रलंबित असताना जाबदेणार क्र.१ चे निधन झाले. वादीने मयत जाबदेणार क्र.१ चे वारस म्हणून जाबदेणार क्र.१.१ ते १.४ यांना प्रस्तुत वादात सामिल केले आहे.

६. जाबदेणार क्र.१.१ व १.३ यांनी नि.७८ येथे त्यांची कैफियत दाखल केली आहे. सदर कैफियतीमध्ये त्यांनी असे कथन केले आहे की, जाबदेणार क्र.१ ते ३ हे वादी संस्थेचे सभासद असलचे कथन त्यांना मान्य नाही. जाबदेणारांनी कर्जच घेतले नसलेने परतफेड करण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. वादीकडून भरपाई खर्च रु.३,०००/- मिळणेची विनंती त्यांनी केली आहे.

७. जाबदेणार क्र.१.२ व १.४ हे समन्स बजावणी होऊन प्रस्तुत वादात हजर झाले नाहीत. त्यामुळे त्यांच्या विरुध्द प्रस्तुत वादाचे कामकाज एकतर्फा चालणेचा आदेश न्यायालयाने दि.०७/११/२०१७ रोजी केला आहे.

८. माझ्या पूर्वपिठासीन अधिकाऱ्यांनी नि.१९ येथे काढलेले मुद्दे आणि त्यावरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे :

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | मागणी केलेप्रमाणे व्याज व दंडासह जाबदेणारांकडून रक्कम रु.६,७३,७३४/- येणे असलेचे वादी संस्था सिद्ध करते काय? | नकारार्थी |
| २. | जाबदेणार क्र.१ हा वादी संस्थेचा सभासद असलेचे | नकारार्थी |

Seal of the Judge Cooperative Court No. ... Sangli.



17/4/23

| | | |
|---|---|---|
| | वादी संस्था सिद्ध करते काय? | |
| ३. | महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा कलम ९१ अन्वये प्रस्तुत वाद ऐकून घेऊन निकाली करणेचे अधिकार क्षेत्र या न्यायालयास आहे काय? | नकारार्थी |
| ४. | वादातील कर्ज व्यवहार व कर्ज कागदपत्रे ही खोटी, निरुपयोगी असलेचे तसेच प्रस्तुत वाद हा रद्द होणेस पात्र असलेचे जाबदेणार क्र.१ ने सिद्ध केले काय? | होकारार्थी |
| ५. | अंतिम आदेश व निवाडा काय? | वाद नामंजूर |

Seal of the Judge Cooperative Court No.1 Sangli.

**कारणमिमांसा**

९. वादीतर्फे श्री.एस.एम.उपाध्ये वकील आणि जाबदेणार क्र.१.१ व १.३ तर्फे श्री.एस.एन.नानवाणी वकील यांचा युक्तिवाद ऐकला.

१०. वादीने त्याचा अधिकृत इसम दत्तात्रय बाबासो पाटील याचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र नि.२२ येथे दाखल केले. त्याला वादी संस्थेने अधिकार दिल्याबद्दलचा ठराव नि.२३ येथे दाखल आहे. कर्ज मागणी अर्ज नि.२४, वचनचिठ्ठी नि.२५, कर्ज रोखा नि.२६, कर्ज खाते उतारा नि.२७, नोटीस नि.२८ अशी कागदपत्रे वादीने दाखल केली. परंतु त्यानंतर सदर इसम वादी संस्थेतील नोकरी सोडून गेलेने आणि त्याचा पत्ता वादीस मिळून येत नसलेने वादीने त्याचा अधिकृत इसम प्रकाश जयसिंग भोसले याचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र नि.४७ येथे दाखल केले. त्याला वादी संस्थेने अधिकार दिल्याबद्दलचा ठराव नि.४८ येथे दाखल आहे. त्यानंतर जाबदेणार क्र.१.१ व १.३ यांची कैफियत आलेवर वादीने पुन्हा त्याच साक्षीदाराचा सरतपास निशाणी ८० येथे दाखल केला आहे. नि.२२ येथील वादीचा साक्षीदार उलटतपासासाठी उपलब्ध न झालेमुळे त्याचा पुरावा वाचता येणार नाही.

17/4/23

११. जाबदेणार क्र.१.१ ने तिचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र नि.३५ येथे दाखल केले आहे. जाबदेणारांचा दुसरा साक्षीदार म्हणजेच जाबदेणार क्र.३ याची साक्ष नि.९४ येथे नोंदविणेत आली आहे.

**मुद्दा क्र.२ व ३ करिता :**

१२. मयत जाबदेणार क्र.१ तसेच त्याचे वारस जाबदेणार क्र.१.१ व १.३ यांनी कैफियतीमध्ये असा बचाव घेतला आहे की, मयत जाबदेणार क्र.१ हा वादी संस्थेचा सभासद नव्हता. अशा परिस्थितीत मयत जाबदेणार क्र.१ हा वादीचा सभासद असलेचे सिध्द करणेची जबाबदारी वादीवर आहे. जाबदेणार क्र.१ ते ३ हे वादीचे सभासद असलेचे वादीचा साक्षीदार प्रकाश जयसिंग भोसले याने सरतपासात सांगितले आहे. परंतु त्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा म्हणजेच जाबदेणार क्र.१ चा सभासदत्व अर्ज, त्याने अनुषंगिक रकमा भरलेबाबत पावत्यांची स्थळप्रत, भाग दाखल्याची स्थळप्रत, नमुना आय आणि नमुना जे रजिस्टर, यापैकी एकही कागदोपत्री पुरावा वादीने न्यायालयासमोर दाखल केला नाही. सबब जाबदेणार क्र.१ हा वादीचा सभासदअसलेचे वादीने सिध्द केलेले नाही. परिणामी प्रस्तुत वाद महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०, च्या कलम ९१ खाली ऐकून घेऊन निकाली करणेचे अधिकार क्षेत्र या न्यायालयास नाही.

अशा प्रकारे मुद्दा क्र.२ व ३ चा निष्कर्ष नकारार्थी येतो.

**मुद्दा क्र.१ व ४ करिता :**

१३. कर्ज कागदपत्रांवरील जाबदेणारांच्या सहया ओळखत असलेचे आणि त्याचे कारण म्हणजे सदर सहया त्याचे समोर केलेल्या असलेचे वादीच्या साक्षीदाराने सरतपासात सांगितले आहे. परंतु उलटतपासामध्ये त्याने असे सांगितले की, सन २००९ पासून तो वादी संस्थेत वरिष्ठ लिपीक काम करत आहे आणि सन २००९ पूर्वी त्याचा वादी संस्थेशी संबंध आलेला नाही. वादातील कर्ज सन २००९ पूर्वीचे असलेचे वादीचेच म्हणणे आहे. सदर बाब वादीच्या साक्षीदाराने त्याच्या उलटतपासामध्ये देखील मान्य केली. तसेच त्याने

Seal of the Judge Cooperative Court Sangli.

17/4/23

असेही मान्य केले की, वादातील कोणतीही कागदपत्रे त्याच्या समक्ष झाली नाहीत, वादातील कर्ज व्यवहार त्याचे समक्ष झाला नाही.

१४. निशाणी ४७ सरतपातसामध्ये वादीच्या साक्षीदाराने असे सांगितले आहे की, खाते उताऱ्यावर शाखा मॅनेजर म्हणून दत्तात्रय बाबासाहेब पाटील यांची सही आहे. निशाणी ८० सरतपातसामध्ये त्याने असे सांगितले आहे की, खाते उताऱ्यावर शाखा मॅनेजर म्हणून उदय जंभू चौगुले यांची सही आहे. खाते उतारा नि.२७ येथे दाखल केला असून त्यावर सही करणाराचे नाव आणि पदनाम यापैकी काहीच नमूद नाही. ती सही नेमकी कोणाची हे देखील वादीचा साक्षीदार सांगू शकला नाही.

१५. यावरुन असे स्पष्ट होते की, जाबदेणारांच्या सहया, वादातील कर्ज कागदपत्रे तसेच कर्ज व्यवहार, खाते उतारा यापैकी कशाचीच माहिती वादीच्या साक्षीदारास नाही.

१६. कर्ज कागदपत्रांवर वादीचे तत्कालीन अध्यक्ष आणि मुख्य व्यवस्थापक यांच्यादेखील सहया असलेचे वादीच्या साक्षीदाराने सरतपासात सांगितले आहे. परंतु वादीतर्फे या दोघांपैकी कोणाचीच साक्ष नोंदविणेत आली नाही. या सर्व परिस्थितीत वादातील कर्ज कागदपत्रे आणि खाते उतारा पुराव्याचे कामी वाचता येत नाहीत आणि वादातील कर्ज कागदपत्रे आणि परिणामी कर्ज व्यवहार सिध्द होत नाही.

१७. वादीतर्फे असा युक्तिवाद करणेत आला की, जर वादातील कर्ज प्रकरण खोटे असते तर वादीने जाबदेणारांना कर्ज मागणी नोटीस पाठविलेवर त्यांनी वादीविरुध्द पोलिसात तक्रार केली असती. जाबदेणारांनी तसे कले नाही म्हणजेच वादातील कर्ज त्यांना मान्य आहे. यावर माझे असे मत आहे की, केवळ जाबदेणारांनी पोलिसात तक्रार न केल्याच्या कारणावरुन वादातील कर्ज व्यवहार सिध्द होत नाही. कर्ज व्यवहार सिध्द करणेची जबाबदारी वादीवर आहे. वादीने ज्याची साक्ष नोंदविली त्याला वादातील कर्ज व्यवहाराची माहिती नाही आणि वादीकडे कर्ज कागदपत्रांसंबंधी उपरोक्त नमूद अन्य दोन साक्षीदार असून देखील वादीने त्यांची साक्ष नोंदविली नाही. अशा प्रकारे वादीने वादातील

Seal of the Judge Cooperative Court No.1, Sangli.



17/4/23

कर्ज कागदपत्रे आणि परिणामी कर्ज व्यवहार सिध्द केलेला नाही. परिणामी कर्ज कागदपत्रे खोटी व बनावट असलेचे सिध्द करणेची जबाबदारी जाबदेणारांवर येत नाही.

१८. जाबदेणार क्र.१.१ हीच जाबदेणार क्र.२ असून तिला जामिनदार म्हणून देखील याकामी सामिल करणेत आलेले आहे. तिने तिच्या सरतपासामध्ये वादातील कर्ज कागदपत्रे तसेच कर्ज व्यवहार नाकारला आहे. वादातील कर्जास जामिन असलेचे तिने उलटतपासामध्ये देखील नाकारले आहे. जाबदेणाराचा साक्षीदार क्र.२ याला देखील जामिनदार म्हणून सामिल करणेत आले आहे. वादातील कर्जास तो जामिन नसलेचे आणि कर्ज कागदपत्रांवर जामिनदार म्हणून असलेली सही त्याची नसलेचे त्याने सरतपासात सांगितले आहे. उलटतपासामध्ये देखील त्याने कर्ज कागदपत्रे लिहून दिलेचे आणि कर्जास जामिन राहिलेचे नाकारले आहे.

अशा प्रकारे कर्ज कागदपत्रे, कर्ज व्यवहार, खाते उतारा यापैकी काहीच सिद्ध न झालेमुळे मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी आणि मुद्दा क्र.४ चा निष्कर्ष होकारार्थी येतो.

उपरोक्त विवेचनावरुन मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. प्रस्तुत वाद खर्चासह फेटाळणेत येत आहे.

२. येणेप्रमाणे हुकूमनामा करणेत यावा.

Seal of the Judge Cooperative Court No 1 Sangli

17/4/23

सांगली.
दिनांक: १७/०४/२०२३

(एस.एस.पोरे)
प्र. न्यायाधीश
सहकार न्यायालय क्र.१,सांगली

# न्यायाधीश,सहकार न्यायालय क्र.१ सांगली यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी एस.एस.पोरे)

सहकारी वाद क्र.७६८/२००९
निशाणी क्र.१००

श्री. गजानन ग्रामीण बिगर शेती सहकारी
पतसंस्था मर्यादित, कुमठे, ता. तासगांव, **वादी**
शाखा - कुमठे तर्फे मॅनेजर श्री. दत्तात्रय बाबासो पाटील
वय - ३५ वर्षे, रा. कुमठे.

**विरुध्द**

१) फडणीस गुणवंत पाटील ( मयत) **जाबदेणार**
वय - ३९ वर्षे, धंदा - मोटर वायडिंग,
१.१) श्रीमती रुपाली फडणीस पाटील
वय- ५० वर्षे, धंदा - घरकाम व शेती,
१.२) अक्षय फडणीस पाटील
वय - २६ वर्षे, धंदा - शेती,
१.३) प्रितेश फडणीस पाटील
वय - २२ वर्षे, धंदा - शेती,
१.४) धनश्री फडणीस पाटील
वय - ३५ वर्षे, धंदा - घरकाम,
सर्व रा. उपळावी, ता. तासगांव, जि. सांगली.
२) रुपाली फडणीस पाटील
वय - ३२ वर्षे, धंदा - शेती व घरकाम,
३) फडणीस बाळू पाटील
वय - ४१ वर्षे, धंदा - शेती,
सर्व रा. मु.पो. उपळावी,
ता. तासगांव, जि.कुमठे.

Seal of the Judge Cooperative Court Sangli.

वादीतर्फे :ॲड.एस.एम.उपाध्ये
जाबदेणार क्र.१.१, १.३,२ व ३ तर्फे :
ॲड.एस.एन.नानवाणी
जाबदेणार क्र.१.२ व १.४ : एकतर्फा

सही.
17/4/23

# हुकूमनामा

दिनांक १६/११/२००९ रोजी दाखल केलेल्या वरील वादाचा दि.१७/०४/२०२३ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम,१९६०, चे कलम ९६ अन्वये दिलेल्या निकालाप्रमाणे प्रस्तुत वाद खालीलप्रमाणे निकाली करणेत येत आहे.

१. प्रस्तुत वाद खर्चासह फेटाळणेत येत आहे.

| अ.क्र. | खर्चाचा तपशिल | वादी | प्रतिवादी |
|---|---|---|---|
| १ | कोर्ट फी स्टॅम्प | ३,८८०/- | -- |
| २ | चलन फी | ५००/- | -- |
| ३ | वकील फी | ४,९५३/- | ४,९५३/- |
| ४ | सेवा शुल्क | ३१५/- | -- |
| **एकूण रुपये** | | ९,६४८/- | ४,९५३/- |

आज दि.१७/०४/२०२३ रोजी हा निवाडा माझे सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला आहे.

सांगली.
दिनांक: १७/०४/२०२३

17/4/23
(एस.एस.पोरे)
प्र.न्यायाधीश
सहकार न्यायालय क्र.१,सांगली